## मंत्रिपरिषद निर्णय
## ३१ मे २०१६
## ( बैठक क्र. ८६ )

| अ.क्र. | विषय | विभाग |
|---|---|---|
| १ | **राज्य कामगार विमा योजनेचे राज्य कामगार विमा महामंडळात रुपांतर** | सार्वजनिक आरोग्य |
| २ | **नागपूरच्या अतिविशेषोपचार रूग्णालयासह ट्रॉमा सेंटरसाठी पदनिर्मितीस मान्यता** | वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये |
| ३ | महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियमात सुधारणा<br>**खंडित झालेल्या अध्यक्ष, सदस्य पदांचे अधिकार समितीला** | जलसंपदा |

## राज्य कामगार विमा योजनेचे
## राज्य कामगार विमा महामंडळात रुपांतर

केंद्र सरकारच्या कामगार मंत्रालयाच्या नियंत्रणाखालील राज्य कामगार विमा महामंडळाकडून चालविण्यात येणाऱ्या राज्य कामगार विमा योजनेचे राज्य कामगार विमा महामंडळात रुपांतर करण्यास आज झालेल्या राज्य मंत्रिपरिषदेच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. या योजनेचा लाभ २४ लाख कामगारांना देण्यात येतो.

महाराष्ट्र राज्यात राज्य कामगार विमा योजना १९५४ पासून लागू करण्यात आली आहे. औद्योगिक क्षेत्रातील ज्या कामगारांचे मासिक वेतन १५ हजार रुपयांपर्यंत आहे अशा कामगारांना ही योजना लागू आहे. त्यासाठी कामगारांच्या वेतनातून तसेच कारखाना मालकांकडून वर्गणीच्या स्वरुपात महामंडळाकडे रक्कम जमा करण्यात येऊन या योजनेतील विमाधारकांना आर्थिक लाभ आणि वैद्यकीय सेवा पुरविण्यात येतात. राज्यातील १८ जिल्ह्यांमध्ये ही योजना लागू करण्यात आली असून २४ लाख नोंदणीकृत विमाधारक आहेत. राज्यात या योजनेची १३ रुग्णालये, ६१ सेवा दवाखाने व ५०६ विमा वैद्यकीय व्यवसायी यांच्या माध्यमातून वैद्यकीय सेवा दिली जाते. राज्य शासन आणि राज्य कामगार विमा महामंडळ अशा दुहेरी नियंत्रणामुळे या योजनेच्या अंमलबजावणीवर प्रतिकूल परिणाम होत असल्याच्या तक्रारी होत्या. तसेच इतर वित्तीय आणि प्रशासकीय अडचणीही येत होत्या. केंद्र शासनानेही ईएसआय अधिनियमात सुधारणा करून राज्यस्तरीय कामगार विमा महामंडळ स्थापन करण्याची तरतूद केली होती. त्यानुसार राज्य कामगार विमा योजनेचे राज्यस्तरीय राज्य कामगार विमा महामंडळ स्थापन करण्याचा निर्णय आजच्या बैठकीत घेण्यात आला.

या महामंडळासाठी पहिल्या तीन वर्षांचा पूर्ण खर्च केंद्र शासनाकडून करण्यात येणार असून त्यानंतर ९० टक्के खर्च केंद्र शासनाकडून करण्यात येईल.

-----o-----

## नागपूरच्या अतिविशेषोपचार रूग्णालयासह ट्रॉमा सेंटरसाठी पदनिर्मितीस मान्यता

नागपूरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अतिविशेषोपचार रूग्णालयात विविध विभागांत अध्यापकांसह वर्ग तीन आणि वर्ग चारच्या पदांच्या निर्मितीस राज्य मंत्रिपरिषदेच्या आजच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. यामुळे अतिविशेषोपचार रुग्णालयासाठी १०० नियमित पदांसह इतर ३५ पदे तर ट्रॉमा सेंटरसाठी १४७ नियमित पदांसह इतर ३३ पदांच्या निर्मिती करण्यात येणार आहे.

नागपूरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व अतिविशेषोपचार रूग्णालयात डी. एम.एम.सी.एच. हा अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहे. या अभ्यासक्रमासाठी भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या मानकानुसार विविध पदांच्या निर्मितीची आवश्यकता होती. त्याचबरोबर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात सुरू करण्यात आलेल्या ट्रॉमा सेंटरच्या उद्घाटनप्रसंगी महाविद्यालयाचे प्रश्न लवकरात लवकर सोडविले जातील, असे अश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले होते. त्यानुसार तातडीने कार्यवाही करत पदांच्या निर्मितीचा निर्णय घेण्यात आला.

राज्यातील आरोग्य सुविधांमध्ये वाढ व्हावी, विद्यार्थ्यांना दर्जेदार वैद्यकीय शिक्षण मिळावे, यासाठी राज्य शासन विविध उपक्रम राबवित आहे, त्यानुसारच ट्रॉमा सेंटर सुरू करण्यात आले आहे, त्याचा सर्वसामान्य रूग्णांना फायदा मिळणार आहे.

-----०-----

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियमात सुधारणा

**खंडित झालेल्या अध्यक्ष, सदस्य पदांचे अधिकार समितीला**

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणावरील अध्यक्ष व सदस्यांच्या काही कारणास्तव मध्येच खंडित झालेल्या जागा भरण्यासाठीची तरतूद महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम २००५ मध्ये अंतर्भूत नाही. अधिनियमात अशा प्रकारची नव्याने तरतूद समाविष्ट करण्यासाठी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम २००५ मध्ये सुधारणा करणारा अध्यादेश काढण्यास मान्यता देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिपरिषदेच्या बैठकीत घेण्यात आला.

या निर्णयानुसार महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम २००५ च्या कलम ३ (क) यामध्ये नव्याने तरतूद करण्यात येणार आहे. त्यानुसार कोणत्याही कारणास्तव प्राधिकरण स्थापन झाले नसल्यास शासन राजपत्रात अधिसूचना प्रसिद्ध करून प्राधिकरणाचे अधिकार, कार्ये व कर्तव्ये एका समितीकडे सोपवेल. या समितीत अतिरिक्त मुख्य सचिव किंवा समकक्ष पदावरील व्यक्ती अध्यक्ष म्हणून काम पाहील. तसेच जलसंपदा विभागातील “जलसंपत्ती व्यवस्थापन व लाभक्षेत्र विकास”चे सचिव आणि वित्त विभागाचे प्रधान सचिव किंवा सचिव हे सदस्य म्हणून काम पाहतील. या समितीचा कार्यकाळ हा सहा महिने किंवा प्राधिकरणाची नियमित स्थापना यामधील कमी असणाऱ्या कालावधीपर्यंत राहील.

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई येथील सदस्य (अर्थव्यवस्था) श्रीमती चित्कला झुत्शी या २२ एप्रिल रोजी कार्यमुक्त झाल्या आहेत. तसेच प्राधिकरणाचे अध्यक्ष रवी बुद्धिराजा हे वयाची ७० वर्षे पूर्ण झाल्यामुळे ८ मे रोजी पदमुक्त झाले आहेत. त्यामुळे सध्या प्राधिकरणावर अध्यक्ष व सदस्य कार्यरत नाहीत. अशी मध्येच खंडित होऊन रिक्त झालेली पदे भरण्याची अधिनियमामध्ये तरतूद नाही. त्यामुळे अधिनियमामध्ये सुधारणा करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला.

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियमामध्ये सुधारणा करण्याबाबतचा महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण (सुधारणा) अध्यादेश, २०१६ या प्रस्तावित अध्यादेशास मंत्रिमंडळाच्या १७ मे २०१६ च्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. यामध्ये वरील तरतूद समाविष्ट करण्यात येणार आहे.

-----o-----